# वसई-विरार शहर महानगरपालिका
## महिला व बालकल्याण विभाग

दि. १०/०१/२०२२

प्रेसनोट

**वसई-विरार शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांनी घ्यावा- महिला व बालकल्याण विभाग, वसई विरार शहर महानगरपालिका यांचे आवाहन**

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत महानगरपालिका हद्दीतील गरीब व गरजुंना अनेक योजना मंजुर केल्या आहेत. यामध्ये **विद्यावर्धीनी शैक्षणिक** योजनेअंतर्गत विधवा महिलांच्या मुली व मुले, निराधार बालके, दिव्यांग,कर्णबधीर व मुकबधीर मुले व मुली, एच.आय.व्ही बाधीत पालकांच्या मुलांना, ज्या महिलेचे पती व्याधीग्रस्त असून अंथरूणास खिळलेले आहेत अशा महिलांच्या मुलांना तसेच अनाथ निराश्रीत बालकांना शैक्षणिक अर्थसहाय्य दिले जाते. तसेच **कोवीड -१९** मध्ये आई किंवा वडीत मयत झालेल्या पालकांच्या मुले व मुलींना शैक्षणिक अर्थसहाय्य दिले जाते.

याचबरोबर **आधारमाया** योजनेअंतर्गत कुष्ठरोग बाधीत पुरुष व महिला, मुले व मुली, तसेच ६० वर्षावरील एकाकी जेष्ठ महिलांच्या उपजिविकेकरिता मासिक अनुदान, **उत्तरदायी** योजनेअंतर्गत गतीमंद, मतिमंद मुलांच्या देखभाली करिता मासिक अनुदान, **सुखदायीनी** योजनेअंतर्गत कुंटूब प्रमुख ७५ टक्के अथवा त्याहून अधिक दिव्यांग असणाऱ्याच्या १४ वर्षा-खालील मुलांना व सर्व वयोगटातील मुली व महिलांना मासिक अनुदान दिले जात आहे.

महिला, युवक व युवती, जेष्ठ पुरुष यांच्या डायलेसिस उपचाराकरिता **जिवनदायीनी** योजनेअंतर्गत प्रति खेप आर्थिक सहाय्य व कर्करोग बाधीत महिलांच्या उपचाराकरिता देखील वैद्यकिय सहाय्य, महिलांना मेमोग्राफी तपासणीकरिता व पॅप स्मीअर तपासणीकरिता अर्थसहाय्य महापालिकेमार्फत देण्यांत येते. **वरदायीनी** योजनेअंतर्गत निराधार,विधवा महिलेच्या मुली व ज्या मुलींचे आई वडिल दिव्यांग आहेत त्या मुलीच्या तसेच अंध, अपंग मुली व अनाथ /निराधार मुलींच्या लग्नाकरिता आर्थिक अनुदान, त्याचबरोबर **दत्तक** योजनेअंर्तगत मुला-मुलींना दत्तक घेतल्यास देखील महापालिकेमार्फत प्रोत्साहन पर आर्थिक सहाय्य देण्यात येते. तसेच **श्रमसाधना** योजनेअंर्तगत ४५% ते ७५% दरम्यान अंधत्व व अपंगत्व असलेल्या महिलांना स्वंयरोजगाराकरिता अर्थसहाय्य, विधवा, निराधार महिलांना स्वंयरोजगाराकरिता अर्थसहाय्य, १८ ते २१ वयोगटातील अनाथ मुलींना उपजिविकेसाठी अर्थसहाय्य देण्यात येते.

या सर्व योजनांची महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत दैंनदीन अमंलबजावणी सुरु असुन, याबाबतची नियमावली व लाभार्थी नमुना फॉर्म महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयांत (महिला व बालकल्याण विभागांत) व महानगरपालिकेच्या www.vvcmc.in या वेबसाईट वर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. महिला व बालकल्याण विभागाच्या या योजनांसाठी अर्ज सादर करण्याची मुदत **दि.१५ फेब्रुवारी, २०२२** पर्यंत वाढविण्यात आली आहे. तरी महानगरपालिका हद्दीतील गरिब व गरजुंनी या योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत करण्यात येत आहे.

**महिला व बालकल्याण विभाग**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**